दिनांक २४/०१/२०२६

# प्रेस नोट

## पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ०४, मुंबई

**घरफोडी करणाऱ्या ०३ सराईत आरोपींना अटक करून गुन्हा उघडकीस आणलेबाबत.**

भोईवाडा पोलीस ठाणे गुरक्र.२६/२०२६ कलम ३०५,३३१(३),(४) भान्यासं. मधील फिर्यादी यांचे दिनांक १२/०१/२०२६ रोजी रात्री ०७:३० वा.ते १३/०१/२०२६ रोजी सकाळी ०९.०० वा. चे दरम्यान विवेकानंद मेन्शन, बी.जे.देवरूखकर रोड, दादर-पुर्व, मुंबई १४ येथील एका कपडयाच्या दुकानाचे शटर उलकटुन अज्ञात ३ इसमांनी १) भारतीय चलनातील ५०० रू. किं.च्या १७० नोटा म्हणजेच ८५,०००/- रू. रोख रक्कम २) भारतीय चलनातील २०० रू. किं.च्या ५० नोटा म्हणजेच १०,०००/- रू. रोख रक्कम ३) भारतीय चलनातील १०० रू. किं.च्या २० नोटा म्हणजेच २,०००/- रू. रोख रक्कम अशी एकूण रोख रक्कम रु.९७०००/- एवढी मालमत्ता चोरी केली म्हणुन गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर गुन्हयाचे गांभीर्य पाहता गुन्हे प्रकटीकरण अधिकारी यांनी केलेल्या तपासादरम्यान तीनही संशयीत इसम हे इस्माईल, बरकत आणि अरबाज असे असून ते रात्रीची घरफोडी करणारे सराईत आरोपी असल्याचे व ते काशी मीरा परिसरात, मुंबई येथे राहत असल्याबाबत माहिती मिळाली. त्यानंतर पोलीस पथक हे वर नमूद तिन्ही आरोपीचा शोध घेणेकामी रवाना होवून तेथे गुप्त बातमीदारांच्या मार्फतीने बरकत शेख यास त्याचे राहते घराचे परिसरातून पोलीस पथकाने बरकत शेख व इस्माईल यांना सापळा लावून ताब्यात घेतले. दोघांना ताब्यात घेतल्यानंतर त्यांच्याकडे कसून तपास करुन अरबाज याला सुद्धा त्याच्या राहत्या घराचे परीसरातून सापळा लावून शिताफीने ताब्यात घेतले.

अटक आरोपीकडे केलेल्या तपासादरम्यान त्याने व्ही.पी. रोड पोलीस ठाणे गु.र.क्र. १७७६/२०२५ कलम ३०५, ३३१(३), ३३१(४) बी.एन.एस. व माटुंगा पोलीस ठाणे गु.र.क्र. १७/२०२६ कलम ३०५, ३३१(३), ३३१(४) बी.एन.एस. या गुन्हयांची कबुली दिली आहे.

**अटक आरोपींची नावे:-**

१)बरकत शफीकउल्ला शेख, २० वर्षे, काम-मजुरी(गॅरेज)
२)इस्माईल अस्लम शहा, २५ वर्षे, काम- मजुरी
३)अरबाज इस्माईल शहा, २५ वर्षे, काम-मजूरी(गॅरेज)

सदरची कामगिरी मा. पोलीस आयुक्त, श्री. देवेन भारती, मुंबई, मा. पोलीस सह आयुक्त, (कायदा व सुव्यवस्था), श्री. सत्यनारायण, मुंबई, मा. अपर पोलीस आयुक्त, मध्य प्रादेशिक विभाग, मुंबई, श्री. विक्रम देशमाने, पोलीस उप-आयुक्त परिमंडळ-०४, श्रीमती रागसुधा आर., सहाय्यक पोलीस आयुक्त भोईवाडा विभाग, घनश्याम पलंगे, व.पो.नि. दत्तात्रय ठाकुर, पो.नि. नितिन महाडीक यांच्या मार्गदर्शनाखाली तपासी अधिकारी परि.पोउनि.राहुल चौधरी, गुन्हे प्रकटीकरण अधिकारी पोउनि. अनिल भोंग, पो.ह.नथुराम चव्हाण, पो.शि.अविनाश सुतार, पो.शि.प्रदिप राठोड, पो.शि.हेमंत सुळे यांनी यशस्वीपणे पार पाडली आहे.

***